# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
## ( निवडणूक शाखा )

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

| | |
|---|---|
| वेबसाईट : www.nwcmc.gov.in | जा.क्र. नांवाशमनपा/निवड/54/2017 |
| ई-मेल : info@nwcmc.gov.in, election@nwcmc.gov.in | दिनांक : 08/08/2017 |
| दुरध्वनी क्र. 02462-233625, 234405, 235710 | फॅक्स क्र. 02462-232071 |


"निवडणूक प्राधान्य"

**कार्यालयीन आदेश**

**विषय :-** <u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2017</u> **मतदार जनजागृती अभियान, Voter Awareness राबविण्यासाठी जनजागृती पथकाची नियुक्ती करणे बाबत.**

**संदर्भ –** राज्य निवडणुक आयोगाकडील आदेश क्र.रानिआ/मनपा/2017/प्रक्र-47/का-5, दि.21.07.2017.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक ऑक्टोंबर 2017 मध्ये पार पडणार आहे. निवडणूकीसाठी राज्य निवडणूक आयोगाने पुर्वतयारी करण्यासाठी संदर्भिय आदेशान्वये निर्देश व सुचना केलेल्या आहेत. त्याअनुषंगाने निवडणूकीसाठी मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी आयोगाने विशेष मोहिम राबविण्यास सुचना केलेल्या आहेत. त्यादृष्टीने उपाययोजना करुन प्रभावीपणे जनजागृती अभियान राबविणे आवश्यक आहे.

सदर अभियान आयोगाच्या सुचना व निर्देशानुसार पुर्ण करण्याच्या दृष्टीने एक स्वतंत्र **मतदार जनजागृती पथक** निर्माण करणे आवश्यक असल्यामुळे खालील अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करुन पथक निर्माण करण्यात येत आहे.

| अ. क्र | पथक प्रमुख | सहाय्यक | करावयाची कामे |
|---|---|---|---|
| 1 | श्री.दिलीप बनसोडे<br>शिक्षणाधिकारी<br>मनपा नांदेड | 1. श्री. रमेश चौरे<br>जनसंपर्क अधिकारी जनसंपर्क विभाग मनपा नांदेड<br>2. सर्व क्षेत्रिय अधिकारी<br>क्षे.का.क्रं. अ,ब,क,ड मनपा नांदेड<br>3. श्री. सज्जन प्रभु, प्रभारी मुख्याध्यापक<br>4. श्री. साईनाथ चिद्रावार,<br>प्रभारी मुख्याध्यापक<br>5. श्री. देवकर<br>प्रोग्रामर शिक्षण विभाग मनपा नांदेड<br>6. श्री. रणविरकर<br>लिपिक, शिक्षण विभाग,मनपा नांदेड<br>7. श्री. जोंधळे<br>शिपाई, मनपा नांदेड<br>8. श्री. येरावार, शिपाई, अविरत विभाग | 1. मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी Education and Voter Awareness च्या माध्यमातून जनजागृती करणे.<br>2. जनजागृतीसाठी महाविद्यालय, विद्यापीठे, उद्योग समूह, अशासकिय संस्था, ईत्यादी ठिकाणी मोठया प्रमाणावर जनजागृती करणे<br>3. मतदार जनजागृतीसाठी पारंपारीक व कल्पक योजना, नविन तंत्रज्ञान सोशल मिडिया ई. चा वापर करणे<br>4. जनजागृतीसाठी वाहनाव्दारे तसेच शाळा, महाविद्यालय, बाजारपेठ ईत्यादी ठिकाणी पथनाटयाव्दारे विविध प्रयोग करण्यात यावे.<br>5. जनजागृतीसाठी लागणारे निविदा / दरपत्रक अंतिम करुन घेण्यात यावे. |

उपरोक्त कामे राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या सुचना व निर्देशानुसार विहित वेळेत पार पाडणे आवश्यक आहे. तरी सर्वांनी सदर कामे स्वतः जातीने लक्ष देवून जनजागृती अभियान यशस्वीरित्या पार पाडावीत. निवडणूकीच्या कामात विलंब अथवा दिरंगाई झाल्यास व्यक्तिशः जबाबदार धरण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी./

आयुक्त,
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**प्रतिलीपी माहितीस्तव:**

1. संबंधित विभाग प्रमुख, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
2. सर्व संबंधिताना अनुपालनास्तव.
3. सर्व क्षेत्रिय अधिकारी क्षे.का.क्रं. अ,ब,क,ड मनपा नांदेड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.